# ई-पुस्तके - तंत्रज्ञानाचे एक वरदान

Saturday, December 29, 2012 AT 12:00 AM (IST)
Tags: सकाळ साप्ताहिक




**ई-बुक रीडर आता ही काही नवी गोष्ट राहिलेली नाही. पुस्तके ई स्वरूपात येण्यासाठीची प्रक्रिया काही दिवसांत घडली नाही. 40 वर्षांपूर्वी तसे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा कुठे हे तंत्रज्ञान इतक्या सोप्या पद्धतीने आपल्या समोर येऊ शकले. कसा झाला ई-बुक रीडरचा प्रवास?**

इंग्लंडमधल्या ऍमेझॉन डॉट कॉमने 2012च्या मध्यावर ई-पुस्तकांच्या खपाने कागदी पुस्तकांच्या खपाला ओलांडल्याचे जाहीर केले. अमेरिकेतील ऍमेझॉन डॉट कॉमने तर हा पल्ला जानेवारी 2011 मध्येच ओलांडला होता. असोसिएशन फॉर अमेरिकन पब्लिशर्स या अमेरिकन संस्थेने जाहीर केलेल्या जून 2011च्या एका रिपोर्टमध्ये अमेरिकन प्रकाशकांना ई-बुकच्या विक्रीतून मिळणारी रक्कम (नेट सेल्स रेव्हेन्यू) पहिल्यांदाच कागदी पुस्तकांपेक्षा अधिक असल्याचे जाहीर केले आहे.

ई-बुकचा इतिहास 40 वर्षांहूनही जुना आहे. 1971 मध्ये मायकल हार्टने गुटेनबर्ग प्रकल्पाची सुरवात केली. या प्रकल्पाअंतर्गत अनेक कागदी पुस्तके त्यांनी संगणकावर आणली. त्यानंतर 1998 मध्ये पहिले ई-बुक वाचता येईल, अशी यंत्रे-ई-बुकरीडर- अमेरिकेच्या बाजारात आली. त्यांची नावे होती रॉकेट "ई-बुक' आणि "सॉफ्ट बुक'; परंतु खऱ्या अर्थाने ई-पुस्तकांना अमेरिकेत चालना मिळाली ती 2007 मध्ये. ऍमेझॉन डॉट कॉमने 19 नोव्हेंबर 2007 रोजी किंडल नावाचा ई-बुक रीडर बाजारात आणला. ऍमेझॉन डॉट कॉम ही कंपनी इंटरनेटवरून पुस्तके विकत होतीच; परंतु जड, कागदी पुस्तके पोस्टाने पाठवण्यापेक्षा लोकांना घरबसल्या कुठलेही पुस्तक एका छोट्याशा यंत्रात वाचायला मिळावे आणि त्यातून आपल्याला जास्त फायदा व्हावा, हा ऍमेझॉनचा हेतू होता. ज्या वेळी किंडल विकायला आले, तेव्हा त्याच्यावर सुमारे 90,000 पुस्तके विकायला होती. 2009 मध्ये अमेरिकेतील "बान्स अँड नोबल' या पुस्तकांची मोठमोठी दुकाने असलेल्या कंपनीनेही स्वत:चा "नूक' हा ई-पुस्तक रीडर अमेरिकेच्या बाजारात आणला. "बान्स अँड नोबल'ही पुस्तकांच्याच व्यवसायात असल्याने त्यांनीही प्रकाशकांशी करार करून अनेक पुस्तकांच्या ई -आवृत्या नूकवरून उपलब्ध करून दिल्या. 2010 मध्ये त्यात भर पडली, ते ऍपल कंपनीच्या एका सेलिब्रिटी रीडरची. ऍपल कंपनीचे आयपॅड हे पुस्तक वाचण्यासाठी अतिशय उपयुक्त आणि लोकप्रिय असे गॅझेट ठरले. त्यानंतर मग ई-बुकने मागे वळून पाहिलेच नाही. आजमितीला अमेरिकेत वर उल्लेख केल्याप्रमाणे कागदी पुस्तकांपेक्षा जास्त ई-पुस्तके खपतात.

एका आकडेवारीनुसार नुसत्या अमेरिकेतच 2010 मध्ये सुमारे सव्वातीन लाख पुस्तके प्रकाशित झाली. 2004 च्या एका आकडेवारीनुसार भारतात हिंदी आणि इंग्रजी मिळून सुमारे 82,500 पुस्तके प्रकाशित झाली. इतर प्रांतिक भाषांमध्ये किती पुस्तके प्रकाशित होत असतील, त्याची कल्पनाच केलेली बरी. दर वर्षी जर एवढी पुस्तके प्रकाशित होत असतील, तर ही पुस्तके कुठल्याही एका दुकानात मिळणे केवळ अशक्यच आहे. एवढी पुस्तके ठेवायची म्हटले, तरी किती मोठे दुकान लागेल? शिवाय अशी किती दुकाने उघडता येणे शक्य आहे? त्यामुळेच इंटरनेटवरून पुस्तक विकण्याची संकल्पना अमेरिकेत पहिल्यांदा लोकप्रिय झाली. ॲमेझॉन डॉट कॉमने इंटरनेटवरून पुस्तके विकायला सुरवात केली. इंटरनेटचा जोमाने प्रसार झाला आणि जसे तंत्रज्ञान प्रगत होत गेले तसे छोट्या आकारात संगणकवजा यंत्र बनवणे शक्य झाले. त्यातूनच पुस्तक वाचता येईल, अशा छोट्या संगणकाचा म्हणजेच ई-पुस्तक रीडर्सचा जन्म झाला. त्यात त्याला इंटरनेटची जोड मिळाल्याने कुठूनही ई-पुस्तके डाऊनलोड करून ती ई-पुस्तकाच्या रीडरवर वाचणे सहज शक्य झाले.

**ई-रीडर्सचे प्रकार आणि सुविधा**



आज अमेरिकेत मिळणारे ई-रीडर्स सर्वसाधारणत: दोन प्रकारचे असतात. पहिला प्रकार म्हणजे ई-इंक तंत्रज्ञान. यात रीडर्सचे स्क्रिन पुस्तकाप्रमाणे असते. ती अंधारात वाचता येत नाहीत. या स्क्रिनवरील अक्षरे व चित्रे फक्त कृष्णधवल रंगातच दिसू शकतात. ॲमेझॉनचे किंडल आणि बान्स आणि नोबलचे नूक या प्रकारात उपलब्ध आहेत. दुसऱ्या प्रकार म्हणजे ई- रीडर अर्थात टॅब्लेट संगणक. ॲपलचा आयपॅड आणि किंडल फायर हे याच प्रकारातील आहेत. याची स्क्रिन इतर कुठल्याही कॉम्प्युटरप्रमाणे रंगीत व अंधारात वाचता येणारी असते. या ई-बुक रीडरना स्पीकर्स बसवलेले असतात आणि फोनप्रमाणे हेडफोन लावायचीही सोय असते. या प्रकारातल्या इ-रीडरवर गाणी ऐकता येतात अथवा चित्रपटही बघता येऊ शकतात. दोन्ही प्रकारच्या ई-रीडरमध्ये वायफाय आणि 3-जी तंत्रज्ञान असलेलेही रीडर मिळतात. वायफाय तंत्रज्ञानावर चालणारे ई- रीडरवर घरी अथवा ऑफिसात जिथे वायफाय नेटवर्क उपलब्ध आहे, तिथे पुस्तके डाऊनलोड करता येतात. 3-जी तंत्रज्ञान ज्या ई-रीडरमध्ये असते, त्यातून स्मार्टफोनप्रमाणे कुठेही गेलात, तरी इंटरनेटवरून पुस्तके डाऊनलोड करता येतात. इतर वेबसाइटही इंटरनेटच्या माध्यमातून बघता येऊ शकतात. एकदा पुस्तके डाऊनलोड केली की मात्र या ई-रीडरना इंटरनेटची गरज उरत नाही. त्यामुळेच हे ई-रीडर ट्रेनमध्ये किंवा विमानात वापरायला सोयीस्कर असतात.

**ई-रीडर लोकप्रिय होण्यामागची कारणे -**

अमेरिका-इंग्लंडमध्ये ई-बुक लोकप्रिय होण्यामागे अनेक कारणे आहेत. अनेक वेळा आपल्याला हवे असलेले पुस्तक दुकानात उपलब्ध असतेच असे नाही. दुकानात जाऊन हात हलवत परत येण्याऐवजी घरबसल्या हवे तेव्हा ई-बुक लॅपटॉप अथवा ई-बुक रीडरवर डाऊनलोड करून वाचता येते. बसमधून किंवा ट्रेनमधून जाताना बरोबर अक्षरशः शेकडो पुस्तके ई-बुक स्वरूपात नेऊन, कंटाळा आला, की पुस्तक बदलता येते. ई-बुक रीडर वजनाला अतिशय हलके आणि पर्समध्ये मावणारे असते. त्यामुळेच त्यांचा प्रसार जास्त होत आहे. तसेच तंत्रज्ञान प्रगत झाल्याने आणि खप वाढल्याने त्यांच्या किमतीही आता मध्यमवर्गीय लोकांच्या आटोक्यात आल्या आहेत. टॅब्लेट कॉम्प्युटर्सचा उदय झाल्याने आता तर वेगळे ई-पुस्तक रीडर घेण्याचीही गरज उरली नाही. तुमच्या अँड्रॉइड टॅब्लेटवर अनेक ऍपमधून पुस्तके डाऊनलोड करून वाचता येतात. आजकाल मोठ्या आकाराचे स्मार्ट फोन बाजारात येत असल्याने त्याच्यावर किंडल ऍप डाऊनलोड करून फोनवरूनही पुस्तक वाचणे शक्य झाले आहे. या सगळ्यांत भर म्हणून छपाई, कागद, पोस्टेज इत्यादी खर्च वाचल्याने प्रकाशकांना इ-बुक कागदी पुस्तकापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. प्यू रिसर्च सेंटरने 2012 च्या सुरवातीला केलेल्या एका पाहणीत असे आढळून आले आहे, की जे लोक ई-बुक रीडरवर पुस्तके वाचतात, ते सर्वसाधारण वर्षाला 24 पुस्तके वाचतात आणि जे लोक कागदी पुस्तके वाचतात ते वर्षाला फक्त पंधरा पुस्तके वाचतात. त्यामुळे ई-बुक रीडरमुळे लोक अधिक पुस्तके वाचू लागले आहेत, असे म्हटले तर चूक होणार नाही.

मराठीतील ई-पुस्तके

सुदैवाने मराठीतही आता ई-बुक निघायला सुरवात झाली आहे. अमेरिकेत स्थित असलेल्या मंदार जोगळेकरांनी 2010च्या ऑगस्ट मध्ये अमेरिकेतील मराठी लोकांना मराठी पुस्तके सहज उपलब्ध व्हावीत, म्हणून "बुकगंगा डॉट कॉम" ही वेबसाइट सुरू केली. आज बुकगंगावर सुमारे 75,000 कागदी व 5,500 ई-पुस्तके उपलब्ध आहेत. बुकगंगाने स्वतः ई-बुक रीडर ऍप्लिकेशन बनवले असून, ते आयपॅड व पीसीवर उपलब्ध आहे. लवकरच हे ऍप्लिकेशन अँड्रॉइडवरही उपलब्ध होणार आहे. या ऍप्लिकेशनमधून बुकगंगात विकत घेतलेली पुस्तके वाचता येतात. त्यामुळे पुस्तके सहजासहजी कॉपी करता येत नाहीत. मराठीमधील सर्वाधिक ई-बुक या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. या वेबसाइटवरील काही ई-बुकमध्ये व्हिडिओचाही समावेश केलेला आहे. नरेंद्र जाधव यांच्या "आमचा बाप आणि आम्ही" या ई-बुकमध्ये असे दृकश्राव्य तुकडेही पाहायला मिळतात. मंदार जोगळेकरांनी मराठीत जम बसवून आता गुजराथी ई-बुकवरही काम करायला सुरवात केली आहे. सर्व भारतीय भाषांतील ई-पुस्तके त्यांच्या ई-रीडर ऍप्लिकेशनवरून उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे.

मीही आजकाल बरीचशी पुस्तके ई-बुक रीडरवरूनच वाचतो. किंडल आणि आयपॅड दोन्हीही माझ्याकडे आहे; पण कधीतरी मात्र एखादे छान पुस्तक हाती लागते; मग मी ते हातांनी चाळायला लागतो. कुठेतरी हुरहुर वाटते. पाने उलटताना होणारा आवाज आणि पानांचा स्पर्श हवाहवासा वाटतो. मग मी ते किंडल आणि आयपॅड कपाटात टाकतो.